<u>स्पे. मु. नं. ६/२०१५ मधील निशाणी क्र. ३० खालील आदेश</u>

१. वादीने सदर अर्ज हा आदेश ११ नियम १५ अन्वये साठेखत हजर करण्यासाठी केलेला आहे. सदर अर्जावर प्रतिवादीने म्हणणे देवुन अर्जास विरोध केलेला आहे. वादी, प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

२. वादीचे अर्जामध्ये कथन की, सदर दाव्यातील प्रतिवादी नं. १ यांनी वादींना दि. २५.१२.२०१४ रोजी दावा मिळकतीचे विसारादाखल रक्कम रुपये ५५ लाख घेवुन साठेखताचा दस्त लिहुन दिलेला आहे. सदर साठेखत दस्त वादी नं. ५ यांच्याकडे ठेवलेला होता. दावा मिळकत नवीन शर्तीची असल्यामुळे सदर मिळकत खरेदी देण्यासाठी उपविभागीय अधिकारी, माळशिरस यांची परवानगी घेण्यासाठी मुळ साठेखताची आवश्यकता आहे असे सांगुन प्रतिवादी नं. १ यांनी तो मुळ दस्त वादी नं. ५ यांच्याकडुन घेवुन गेलेले आहेत.

३. वादीचे पुढे कथन की, प्रतिवादी नं. १ ने साठेखतातील मिळकत परस्पर प्रतिवादी नं. २ व ३ यांना दि. २०.०२.२०१५ रोजी खरेदी करुन दिलेली आहे. त्यामुळे सदरचा दावा वादीने साठेखताप्रमाणे खरेदीखत होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दावा हा चौकशीसाठी आहे. प्रतिवादी नं. १ ने दि. २५.१२.२०१४ रोजी वादींना लिहुन दिलेला मुळ साठेखत यातील प्रतिवादी नं. १ ने आपल्या ताब्यात ठेवलेले आहे. त्यास वादींनी दि. २५.१२.२०१४ रोजी मुळ साठेखत न्यायालयात हजर करण्याकरिता कळविले, परंतु नोटीस मिळुनही ते दाखल केलेले नाही. प्रतिवादी नं. १ ने साठेखताचे अस्तित्व नाकारलेले नाही. त्यामुळे मुळ दस्त हा त्याच्याकडे आहे. तरी मुळ दस्त हजर करण्यासाठी हुकूम व्हावा अशी मागणी केलेली आहे.

४. प्रतिवादीनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केलेले आहे. या प्रतिवादींचे कथन की, अर्जातील मजकुर खोटा आहे. प्रतिवादी नं. १ कडुन वादीने साठेखत करुन घेतलेले नाही. त्यामुळे प्रतिवादी नं. १ कडे मुळ दस्त नाही. मुळ दस्त हा वादीकडेच असणे आवश्यक आहे. परंतु मुळ दस्त बनावट असल्याने तो दस्त न्यायालयासमोर येवु नये म्हणुन सदरचा खोटा अर्ज दिलेला आहे व अर्जात खोटी मागणी केलेली आहे.

५. याठिकाणी वादी, प्रतिवादी यांची कथने व दाखल पुराव्याचे अवलोकन केले असता याठिकाणी वादीने अर्जामध्ये मागितलेले दस्तऐवज हे प्रतिवादी नं. १ यांच्या ताब्यात असल्याचे वादींनी सांगितलेले आहे. परंतु प्रतिवादी यांनी सदर दस्त हा प्रतिवादीकडे नसल्याचे कथन केलेले आहे. याठिकाणी मुळ दस्ताबाबत प्रतिवादी नं. १ ने नाकारलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी नं. १ यास दस्त हजर करावा असा जरी आदेश केला तरी त्याचा उपयोग् होणार नाही. त्यामुळे याठिकाणी प्रतिवादी नं. १ यांनी मुळ साठेखत नाकारल्यामुळे त्याअनुषंगाने वादी यांनी योग्य ती प्रक्रिया अवलंबावी. सबब याठिकाणी या गोष्टीचा विचार करता सदर अर्ज हा चालण्यास पात्र नाही. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आ दे श</u>

वादीचा निशाणी ३० वरील अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात येत आहे.

दिनांक - २३.०६.२०१६.

( एस एस इंदलकर )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
माळशिरस

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this PDF file Order is same word to word as per the original Order.

(a) Name of the Stenographer : **S. M. Malkapalli**

(b) Court : **Civil Court Senior Division, Malshiras.**

(c) Order signed by P.O. on : **23.06.2016.**

(d) Order uploaded on : **23.06.2016.**